महाराष्ट्र शासन

अश्विनी भिडे

क्रमांक- उपक्रम २३१४/(१७९/१४)/एस.डी.-४
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०३ नोव्हेंबर, २०१४

**विषय :** "बाल स्वच्छता मोहिम" - दिनांक १४ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर, २०१४.

**संदर्भ :** डॉ. सतबीर बेदी, सह सचिव, भारत सरकार, शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, नवी दिल्ली यांचे मा. सचिव, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना दिलेले पत्र क्र. F. No.७-११५/२०१४ UT२, दिनांक २९/१०/२०१४.

दिनांक ०२ ऑक्टोबर, २०१४ रोजी महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून बालकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्यादृष्टीने भारत सरकारद्वारे "स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय" ही मोहिम सुरू करण्यात आली आहे. मोहिमेच्या माध्यमातून शाळांमध्ये स्वच्छता व आरोग्य या विषयाकडे विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

स्वच्छता व आरोग्य विषयक जनजागृती करण्यासाठी गाव स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत प्रयत्न करण्यात येत आहे. मा. पंतप्रधान यांनी सर्वांना स्वच्छ भारत हे ध्येय साध्य करण्यासाठी संघटित प्रयत्न करण्याबाबत आवाहन केले आहे. तसेच प्रत्येक शाळेमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र वापरण्यायोग्य स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्याबाबत शासकीय यंत्रणेस निर्देश दिले आहेत व समाजातील इतर घटकांना या कामी योगदान देण्याबाबत आवाहन केले आहे.

बालके आणि स्वच्छतेचे महत्त्व :

शाळा या शिक्षणाचे केंद्रबिंदू असून त्या माध्यमातून पालक, समाज यांना बालकांच्या माध्यमातून स्वच्छता, आरोग्य व नीटनेटकेपणा याबाबतचा संदेश पोहचविता येईल. याकामी बालके हे आदर्श व परिणामकारक भूमिका वजावू शकतात. त्यांच्या माध्यमातून त्यांच्या घरामध्ये, भावंडे, त्यांचे सवंगडी यांच्यामध्ये स्वच्छताविषयक जाणीव जागृती निर्माण करु शकतो. यासाठी शाळांमध्ये मीना-राजू मंच, विद्यार्थ्यांचे विविध गट यामध्ये शाळा आरोग्य मंत्री यांच्यामार्फत आरोग्य व स्वच्छताविषयक विविध उपक्रमांची अमलबजावणी करून त्याअनुषंगाने बालकांना वैयक्तिक स्वच्छता, त्यांचे घर, शाळा व सभोवतालचा परिसर स्वच्छ व नीटनेटका ठेवण्याचे महत्त्व पटवून देऊन याकामी त्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

प्रत्येक शाळेमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, हात धुण्याची जागा (Hand Washing Station), पिण्याच्या पाण्याची सुविधा, नियमित स्वच्छता व आरोग्य विषयक निगा व देखभाल याबाबी असणे आवश्यक आहे.

**बाल स्वच्छता मोहिमेचे स्वरूप :**

"स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय" या मोहिमेंतर्गतच दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी बालदिनाचे औचित्य साधून स्वच्छता व आरोग्य विषयक जाणीव जागृती करण्यासाठी "बाल स्वच्छता मोहिम" राबविण्याचे भारत सरकारने ठरविले आहे.

या मोहिमेच्या अंमलबजावणीच्या माध्यमातून स्वच्छ भारत हे ध्येय २०१९ पर्यंत साध्य करण्यासाठी बालकांची महत्त्वाची भूमिका असणार आहे. "बाल स्वच्छता मोहिम" दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ ते १९ नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत राबवावयाची असून त्यामध्ये स्वच्छता या घटकावर लक्ष केंद्रीत करून याबाबतचा संदेश सर्वांपर्यंत पोहचविणे अपेक्षित आहे. स्वच्छ पाणी, परिसर स्वच्छता व त्याद्वारे शाळेमध्ये आरोग्यदायी व प्रफुल्लित वातावरण निर्माण होऊ शकेल. त्यामुळे बालक व त्यांचे कुटुंब यांच्यामध्येही आरोग्यविषयक चांगल्या सवयी रूजण्यास मदत होईल. आजाराचे प्रमाण कमी होऊन बालकांच्या उपस्थितीमध्ये वाढ होईल व त्यांची संपादणूक पातळी वाढेल. यामुळे खऱ्या अर्थाने बालकांचे शैक्षणिक समानतेचे समावेशन होईल आणि याचा राष्ट्र विकासामध्ये आर्थिक वृद्धी होण्यासाठी हातभार लागेल.

सदर मोहिमे अंतर्गत जिल्हा, तालुका, ग्रामपंचायत, इत्यादी स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. "बाल स्वच्छता मोहिमेची" प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या पूर्वतयारीच्यादृष्टीने आपल्या स्तरावर पत्रकार परिषद घेऊन या मोहिमेच्या अंमलबजावणीबाबत प्रचार प्रसार करण्यात यावा. तसेच वातावरण निर्मितीसाठी स्वच्छता व आरोग्य विषयक संदेश देणारे बॅनर, होर्डिंग्ज, Digital Electronic Boards, इत्यादी कल्पकरित्या तयार करून विविध कार्यालयाच्या मुख्यालयी तसेच कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रदर्शित करण्यात यावे.

**मोहिमेंतर्गत राबवावयाचे उपक्रम :**

मोहिमेचे उद्दिष्ट विचारात घेऊन विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. याबाबत मार्गदर्शनार्थ पुढीलप्रमाणे कार्यक्रम सूचित करण्यात येत आहेत :

| दिनांक व कार्यक्रम | सुचविण्यात आलेले कार्यक्रम |
|---|---|
| दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४<br>"स्वच्छ शाळा व स्वच्छ परिसर" | • बालदिनाचे औचित्य साधून सर्वांनी स्वच्छता व आरोग्यविषयक शपथ घ्यावी.<br>• मुख्याध्यापकांनी "बाल स्वच्छता मोहिम" सप्ताह व वर्षभर "स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय" या मोहिमेच्या अंमलबजावणीतून स्वच्छता व आरोग्य विषयक माहिती सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती यांना द्यावी.<br>• परिसर स्वच्छतेचे महत्त्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगावे.<br>• वर्गखोल्या, उपक्रम खोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वयंपाकगृह, इ. ची बालकांनी व शिक्षकांनी स्वच्छता करावी.<br>• त्याचप्रमाणे क्रीडांगण व शाळेच्या इमारती भोवतालचा परिसर स्वच्छ करावा. तसेच क्रीडा साहित्याची व्यवस्थित मांडणी करावी. |

| दिनांक व कार्यक्रम | सुचविण्यात आलेले कार्यक्रम |
|---|---|
| | • शालेय परिसरातील घन कचरा व्यवस्थापन, टाकाऊतून उपयुक्त, टिकाऊ साहित्य तयार करण याबाबत चर्चा घडवून आणावी.<br>• "सुंदर वर्गखोली" अशी स्पर्धा घेऊन सर्वात स्वच्छ व व्यवस्थित वर्गास उत्कृष्ट वर्ग म्हणून जाहीर करावे.<br>• इमारत व परिसर स्वच्छतेबाबत निबंध आणि पोस्टर्स् स्पर्धा घ्यावी. |
| दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४<br>"स्वच्छ व संतुलित आहार" | • शाळेलगतच्या आरोग्य केंद्रास भेट देऊन संतुलित आहार व आरोग्याची माहिती जाणून घेणे. त्यावर आधारित Power Point Presentation, Video Clips, पोस्टर्स् दाखविणे.<br>• बालकांना संतुलित आहार, पोषक आहार व अन्नधान्य, फळ-भाज्या, इत्यादीबाबत माहिती द्यावी.<br>• जेवणापूर्वी, शौचालयास जाऊन आल्यानंतर हाताची स्वच्छता राखण्याबाबत जागृती निर्माण करणे.<br>• नियमित हात धुण्याची सवयी, हात धुण्याच्या १० पद्धती व हात धुण्याचे महत्त्व उपक्रमाद्वारे पटवून देणे.<br>• आहारतज्ज्ञ, स्थानिक वैद्यकीय अधिकारी यांचे व्याख्यान आयोजित करणे. |
| दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४<br>"स्वच्छ मी" वैयक्तिक स्वच्छता | • आरोग्य व स्वच्छतेचे महत्त्व समजून देण्याच्यादृष्टीने स्वतःची स्वच्छता, स्वतःची खोली, स्वतःचा परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व पटवून देणे.<br>• किशोरवयीन मुला-मुलींना आरोग्यविषयक बाबींचे महत्त्व समजवून देणे.<br>• वैयक्तिक स्वच्छतेचे १० नियम मुलांनाच तयार करण्यास सांगावे.<br>• माता-पालक मेळाव्यांचे केंद्र पातळीवर आयोजन करण्यात यावे. त्यामध्ये आरोग्य व वैयक्तिक स्वच्छता याबाबत माता व किशोरवयीन मुलींमध्ये जागृती निर्माण करणे. |
| दिनांक १८ नोव्हेंबर, २०१४<br>"स्वच्छ पाणी" | • गाळलेले पिण्याचे स्वच्छ पाणी, सुरक्षित हाताळणी, निर्जंतुकीकरण इत्यादीबाबत उद्बोधन करणे.<br>• पाणी शुद्धीकरण केंद्रास भेट देऊन पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया बालकांना समजावून देणे.<br>• बालकांकडून पाणी बचत, स्वच्छ पाणी यासारख्या घटकांवर Stickers तयार करून ते घरामध्ये लावण्यास सांगणे.<br>• शाळेमध्ये उपलब्ध पिण्याच्या पाण्याची टाकी व इतर साठे यांची स्वच्छता करण्यात यावी.<br>• निर्जंतुक पाणी उपलब्धतेबाबत जागृती करण्यात यावी. अशुद्ध पाण्यामुळे होणारे रोग याबाबत माहिती देऊन ते टाळण्यासाठी शुद्ध पाण्याचे महत्त्व व आवश्यक उपाययोजना सुचविणे. |
| दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४<br>"स्वच्छ शौचालय" | • जागतिक शौचालय दिनाचे औचित्य साधून शौचालयाचा वापर व स्वच्छतेबाबत उद्बोधन करणे.<br>• बालक व शिक्षकांनी स्वच्छतागृहाची पाहणी करून त्याची नियमित स्वच्छता करण्यासाठीचे नियोजन करावे.<br>• बालकांना स्वच्छतागृहाचा नियमित वापर करण्याचे आवाहन करण्यासाठी त्यावर आधारित Power Point Presentation, Video Clips, पोस्टर्स् दाखविणे.<br>• शाळेतील स्वच्छतागृहाचा नेहमी उपयोग करण्यासाठी स्वच्छतागृह व.. |

| दिनांक व कार्यक्रम | सुचविण्यात आलेले कार्यक्रम |
|---|---|
| | असावे याबाबत विद्यार्थ्यांची चर्चा घडवून आणावी.<br>• सर्व शाळा, कार्यालयामध्ये स्वतंत्र वापरण्यायोग्य स्वच्छतागृह उपलब्ध करून देणे. स्वच्छतागृहाची नियमित साफसफाई करणे. |

ज्या शाळांना दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी सुट्टी असेल अशा शाळांनी या मोहिमेचा प्रारंभ दिनांक १३ नोव्हेंबर, २०१४ रोजी करावा. वरील उपक्रमाशिवाय स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन अन्य नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात यावेत. यासाठी विद्यार्थ्यांकरवी स्वच्छतेचा संदेश सर्व कुटुंबांपर्यंत पोहचविण्यात यावा.

**स्पर्धांचे आयोजन :**

या मोहिमेच्या प्रारंभी किंवा मोहिमेच्यादरम्यान स्वच्छता व आरोग्य विषयक जनजागृती करणारे संदेश देणाऱ्या विविध स्पर्धांचे स्थानिक पातळीवर आयोजन करण्यात यावे. त्यामध्ये चित्रकला, निबंध, घोषवाक्य, गायन, रांगोळी, इत्यादी स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. भारत सरकारच्या mygov.in या संकेतस्थळावरून विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच संकेतस्थळावर स्वच्छतेशी संबंधित विविध संकल्पनांवर (Theme) आधारित स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे.

**शिक्षक व मुख्याध्यापकांसाठी सूचना :**

१) स्वच्छता व आरोग्य विषयक संदेश, त्यावर आधारित गोष्टी, याबाबत नियमित परिपाठाच्यावेळी सांगण्यात याव्या. तसेच स्वच्छता विषयक प्रार्थना, गीते तसेच क्रमिक पुस्तकांमधील स्वच्छता विषयक संदर्भ यांच्याद्वारे मुलांशी संवाद साधणे.

२) बालके जेवणापूर्वी व जेवणानंतर, स्वच्छतागृहाचा वापर केल्यानंतर हात स्वच्छ धुत असल्याची खात्री करावी.

३) हात धुण्याच्या जागी साबण, पाणी, हातरुमाल उपलब्ध असल्याची खात्री करावी.

"बाल स्वच्छता मोहिम" ही विहीत मुदतीत कालबद्ध कृति कार्यक्रमाद्वारा राबवावयाची आहे. यामध्ये सर्व घटकांचा उत्स्फूर्त सहभाग आवश्यक आहे. वरील उपक्रमासोबतच आपल्या स्तरावरूनही स्वच्छता व आरोग्यविषयक नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात यावी.

**स्वच्छता दूत :**

"बाल स्वच्छता मोहिमेच्या" माध्यमातून विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीद्वारा बालकांना प्रोत्साहित व प्रेरित करून त्यांच्यामार्फत आसपासच्या प्रत्येक घरामध्ये स्वच्छता विषयक संदेश पोहचविण्यासाठी त्यांची "स्वच्छता दूत" म्हणून निवड करावी. यामध्ये प्रत्येक बालकास ३ ते ४ कुटुंबांना भेटी देऊन त्यामधील सदस्यांना स्वच्छता, आरोग्य, नीटनेटकेपणा, इत्यादीबाबत माहिती देण्यासाठी प्रेरित करावे. बालकांकरवी कुटुंबातील सदस्यांना स्वच्छतेचे महत्त्व, स्वच्छता विषयक नियमांचे पालन, इत्यादी बाबींची जनजागृती करण्यात यावी. सदर

काम स्वयंस्फूर्तीने व स्वइच्छेने करणाऱ्या बालकांना देण्यात यावे. यामध्ये कोणत्याही प्रकारचे बंधन घालण्यात येऊ नये.

**स्थानिक लोकप्रतिनिधींचा सहभाग :**

शिक्षणामधून विद्यार्थ्यामध्ये चांगल्या कलागुणांची जोपासना करण्यासाठी वेळोवेळी विविध उपक्रम राबविण्यात येतात. भारत सरकारच्या "स्वच्छ भारत मोहिमेचे" उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व पक्षीय स्थानिक सन्माननिय लोकप्रतिनिधी यामध्ये ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, नगरपालिका / नगरपरिषद / महानगरपालिकांचे नगरसेवक, नगराध्यक्ष, महापौर, पंचायत समितीचे सदस्य, सभापती, जिल्हा परिषद सदस्य, अध्यक्ष तसेच आमदार, खासदार, मंत्री इत्यादींना "बाल स्वच्छता मोहिम" अंमलबजावणीमध्ये सहभागी करुन घेण्यात यावे. त्यांच्या मतदार संघात बाल स्वच्छता मोहिमे अंतर्गत विविध कार्यक्रम राबवावेत. याकामी स्थानिक लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग व सहकार्य घेण्यात यावे.

त्याचप्रमाणे "बाल स्वच्छता मोहिम" राबविण्यासाठी आपण सर्व घटकांना यामध्ये सक्रीय सहभागी करुन घ्यावे. त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उत्साहवर्धक व आनंददायी वातावरण मिळाले तर त्याची शाळेबाबतची गोडी वाढेल, परिणामत: त्यांची उपस्थिती, शालेय उपक्रमातील सहभाग व एकंदरीतच दर्जेदार शिक्षण घेणे यामध्ये सकारात्मक बदल होईल. याच भूमिकेतून दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ ते १९ नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत सर्व शाळांमध्ये, सर्व विभागाच्या समन्वयाने (ग्राम विकास विभाग, नगर विकास विभाग, महिला व बालविकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) शिक्षण विभागाशी संलग्न कार्यालयामधून "बाल स्वच्छता मोहिम" राबविण्यात यावी. आपण स्वत: या मोहिमेमध्ये सक्रीय सहभागी होऊन आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांमध्ये अधिनस्थ यंत्रणेमार्फत प्रभावी अंमलबजावणी करून "बाल स्वच्छता मोहिमेच्या" माध्यमातून स्वच्छ भारत हे उद्दिष्ट साध्य कराल. या मोहिमेस स्थानिकस्तरावरुन प्रसिध्दी देण्यात यावी. विविध माध्यमातून या मोहिमेचा प्रचार व प्रसार करण्यात यावा.

प्रत्येक शाळेमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, हात धुण्याची जागा (Hand Washing Station), पिण्याच्या पाण्याची सुविधा, नियमित स्वच्छता व आरोग्य विषयक निगा व देखभाल याबाबी असणे आवश्यक आहे.

(अश्विनी भिडे)

प्रति,

१) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

प्रत माहितीस्तव सादर,

१) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, चर्नी रोड, मुंबई.
३) विभागीय आयुक्त, महसूल विभाग (सर्व).
४) आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, २८ क्वीन्स गार्डन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, कुमठेकर मार्ग, पुणे.
८) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ "बालभारती", सेनापती बापट मार्ग, पुणे.
९) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्यामागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे.
१०) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, आंबेडकर रोड, पुणे.
११) प्रशासकीय अधिकारी, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, बालचित्रवाणी, आगरकर मार्ग, पुणे.
१२) सह संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मीपा), भडकलगेट, औरंगाबाद.

प्रती,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म. न. पा., नागपूर.

सदर "बाल स्वच्छता मोहिम" चे नियोजन करुन कार्यवाही करावी.